**प्रकल्प प्रवर्तक मा. कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, सांगली, महाराष्ट्र यांनी प्रस्तावित केलेल्या टेंभू उपसा सिंचन प्रकल्पाचे विस्तारीकरण, जिल्हा सांगली, सातारा व सोलापूर, महाराष्ट्र ( 109 गावे ) या प्रकल्पा बाबतच्या जाहीर लोक सुनावणीचे इतिवृत्तांत.**

---

प्रकल्प प्रवर्तक **कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, सांगली, महाराष्ट्र यांनी प्रस्तावित केलेल्या टेंभू उपसा सिंचन प्रकल्पाचे विस्तारीकरण, जिल्हा सांगली, सातारा व सोलापूर, महाराष्ट्र ( १०९ गावे) (यामध्ये सातारा जिल्हयातील माण तालुक्यातील एकूण २० गावे व खटाव तालुक्यातील एकूण ३१ गावे अशा एकूण ५१ गावे) प्रकल्पा बाबतची जाहीर लोकसुनावणी** मंगळवार, दिनांक ५ मार्च , २०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता ताई कन्वेन्शन हॉल, श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक, मल्हारपेठ - पंढरपूर रोड , विखळे फाटा, मु.पो. विखळे , ता. खटाव जि सातारा , महाराष्ट्र, येथे घेण्यात आली.

श्री. अमोल आ. सातपुते, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सातारा तथा आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मा श्री. नागेश पाटील, अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा निवासी उप जिल्हाधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी, सातारा तसेच सदस्य-पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती श्री. प्रशांत गायकवाड, उप प्रादेशिक अधिकारी, पुणे तथा प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे यांचे प्रतिनिधी, प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरण विषयक कार्यरत सेवाभावी संस्था, विविध चॅनलचे प्रतिनिधी व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत करुन माननीय अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी प्रक्रिया सुरु केली.

आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जन सुनावणी समिती यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक ०१ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ आणि सुधारित अधिसूचने नुसार संवर्ग १(सी) मध्ये मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास मंत्रालय पर्यावरण, वने व हवामान बदल,भारत सरकार नवी दिल्ली यांची

आगाऊ "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तक कार्यकारी अभियंता लघु पाटबंधारे विभाग, सांगली महाराष्ट्र यांनी प्रस्तावित केलेल्या टेंभू उपसा सिंचन प्रकल्पाचे विस्तारीकरण, जिल्हा सांगली, सातारा व सोलापूर महाराष्ट्र (१०९ गावे) (यामध्ये सातारा जिल्हयातील माण तालुक्यातील एकूण २० गावे व खटाव तालुक्यातील एकूण ३१ गावे अशी एकूण ५१ गावे) प्रकल्पा संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास दिनांक १०/०१/२०२४ रोजी अर्ज प्राप्त झाला होता.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण सयंत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनीसदरहू प्रकल्पास मंत्रालय पर्यावरण, वने व हवामान बदल,भारत सरकार नवी दिल्लीयांची प्राथमिक मान्यता (ToR) प्रदान करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज दिनांक ०९ ऑगस्ट २०२३ रोजी सादर केला व त्यास अर्जास भारत सरकारने ऑनलाईन मंजूरी दिनांक २ नोव्हेंबर २०२३ रोजी प्रदान केली.

मा. जिल्हाधिकारी, सातारा यांनी सदरची जनसुनावणी मंगळवार दिनांक ५ मार्च, २०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता घेणे बाबत मान्यता दिल्यानंतर मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना २००६ व सुधारित अधिसुचना २००९ अनुसार त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई .29 / 2023, व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी-230426 -एफटीएस 022 दिनांक 26-04-2023 अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली त्यानुसार सुनावणीस खालील प्रमाणे उपस्थिती होती.

१) मा. श्री. नागेश पाटील, , - **अध्यक्ष**

निवासी उप जिल्हाधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी, सातारा

२) श्री. प्रशांत गायकवाड , - **सदस्य**

सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर सुनावणी समिती,

प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे यांचे प्रतिनिधी

तथा उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे.

३) श्री. अमोल आ. सातपुते, - **आयोजक**

उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सातारा

सदरहू अधिसूचनेनुसार उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सातारा यांनी जनसुनावणी दिवसाच्या 30 दिवस अगोदर स्थानिक मराठी वृत्तपत्र दैनिक पुढारी व राष्ट्रीय वृत्तपत्र दि इंडियन एक्सप्रेस यात इंग्रजीत ०१/०२/२०२४ रोजी जनसुनावणीबाबत प्रकाशित केली होती. त्याचप्रमाणे सदरहू प्रकल्पाबाबतचा सर्व दस्तावेज नागरिकांच्या माहितीकरीता खालील अधिसूचित कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेले होते.

1. जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा.
2. जिल्हा उदयोग केंद्र , सातारा
3. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, सातारा
4. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (मुख्यालय) कल्पतरु पॉईंट , ३ रा व ४ था मजला, सायन माटुंगा, स्किम रोड क्र ८ , सायन सर्कल समोर, सायन (पूर्व) , मुंबई – ४०००२२ .
5. प्रादेशिक अधिकारी , म. प्र. नि. मंडळ , जोग सेंटर, ३ रा मजला , वाकडेवाडी, जुना पुणे – मुंबई रोड पुणे ४११ ००३
6. क्षेत्रीय कार्यालय, पश्चिम मध्य झोन, पर्यावरण , वने व हवामान बदल मंत्रालय, न्यू सेक्रेटरीयल बिल्डींग , तळमजला इस्ट विंग, सिव्हील लाईन नागपूर .
7. पर्यावरण विभाग, नविन प्रशासकीय भवन १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय मुंबई- ३२
8. उप प्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नविन प्रशासकीय इमारत २ रा मजला एसटी स्टँडच्या पाठीमागे , सदरबझार सातारा
9. तहसिल कार्यालय, खटाव (वडूज) , तहसिल कार्यालय खटाव, ता खटाव जि सातारा
10. तहसिल कार्यालय, दहिवडी, तहसिल कार्यालय दहिवडी, ता. माण , जि सातारा
11. उपविभागीय अधिकारी, उपविभाग माण- खटाव जि सातारा

12. ग्रामपंचायत कार्यालय कलेढोण, तरसवाडी, गारुडी, गराळेवाडी, मुळीकवाडी, पाचवड, विखळे, ढोकळवाडी, मायणी , हिवारवाडी, मानेवाडी, कान्हरवाडी खतवळ, पडळ, अनफळे, धोंडेवाडी, दातेवाडी, पळसगांव, कणसेवाडी, एनकुळ, बैलमरवाडी, पिंपरी, कातरखटाव, डांगेवाडी, बोंबाळे, दालमोडी, हिंगणे , तडवळे, मांडवे, पेडगांव, सातेवाडी, ता खटाव, जि सातारा.

13. ग्रामपंचायत कार्यालय विरळी , काळधोंडी, महाबळेश्वरवाडी, शेनवडी, वरकुटे, मलवडी, कुरणेवाडी, लोढावडे, बनगरवाडी, जांभुहणी, चिलारवाडी, वळई , पुकळेवाडी , कुकुडवाडी , वडजल , नरवाने, दोरगेवाडी, काळेवाडी (नरबाने) , किरकसाल, ढाकणी, पळसावडे ता. माण , जि सातारा

आयोजक यांनी आजपर्यंत उपरोक्त प्रकल्पाविषयी उप प्रादेशिक अधिकारी ,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सातारा यांचेकडे कोणत्याही लेखी सूचना प्राप्त झाल्या नसल्याचे सांगीतले. तथापि आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप,हरकती, सूचना असल्यास प्रकल्प सादरीकरणानंतर तसे मांडण्यात याव्यात असे सांगितले.

आयोजक यांनी प्रतिपादन केले की आपण जनसुनावणीत उपस्थित केलेल्या सूचना / आक्षेप यांची इतिवृतात नोंद घेण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीची व्हिडिओ रेकॉर्डींग जशीच्या तशी चित्रफित, बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेऊन प्रकल्प प्रवर्तकांचा सुधारित पर्यावरण मुल्यांकन अहवाल पुढील कार्यवाहीसाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांचेमार्फत केंद्र शासनास सादर करण्यांत येईल. त्यानंतर मा. अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्प प्रवर्तकास सादरीकरण सुरु करण्याची विनंती केली.

मा.अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्प प्रवर्तक महाराष्ट्र कृष्णाखोरे विकास महामंडळ, (MKVDC), जिल्हा सांगली यांचे पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पाविषयी व पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी सादरीकरण करताना सांगितले की सातारा सांगली व सोलापूर जिल्ह्यातील वंचित १०९ गावामधील ४१००३ हे .क्षेत्रास सिंचनाचा लाभ देण्यासाठी जलसंपदा विभाग महाराष्ट्र शासन यांचे कडुन दि२०२३/०९/३० रोजी ८ टिएमसी पाणी उपलब्धेतेस अंतिम मान्यता मिळालेली आहे. दरवर्षी येथील जनता दुष्काळाने त्रस्त आहे. या गावांना पाणी देणेबाबत लोकप्रतिनिधी व शेतक-यांची मागणी ही अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. सातारा सांगली व सोलापूर जिल्हयातील ९ तालुक्यातील १०९ गावातील ४१००३ हे .क्षेत्रास सिंचनाचा लाभ देणे प्रस्तावित आहे सादरीकरणा नंतर मिटकॉन कंपनीचे श्री श्रीकांत काकडे यांनी प्रस्तावना केली. त्यात त्यांनी पर्यावरण विषयक प्रकल्पाची गरज, त्याचे महत्त्व , प्रकल्पाचे भूसंपादन, पर्यावरण मंजूरी, पर्यावरण व्याप्ती व पध्दती तसेच पर्यावरणीय बाबींचे संक्षिप्त वर्णन केले. मा आयोजक उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण

नियंत्रण मंडळ, सातारा यांनी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी मध्ये उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक कांही आक्षेप, सुचना असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक/प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे:-**

| अ.क्र | शेतक-याचे नांव व गांव | मांडलेले मत |
|---|---|---|
| १ | श्री प्रदिप यलमर, कान्हरवाडी | पर्यावरणीय आक्षेप नाही. परंतु प्रत्यक्ष कामाला कधी सुरुवात होणार याविषयी मार्गदर्शन करावे.<br><br>श्री महेश मधुकर रासनकर , कार्यकारी अभियंता, ल.पा.वि. सांगली यांनी उत्तर दिले – कामाची निविदा प्रसिध्द झाली आहे. जुन ते जुलै महिन्यामध्ये काम चालू होईल. संपूर्ण काम व्हायला दोन वर्ष लागतील. |
| २. | श्री विनोद पांडूरंग देशमुख, विखळे | खाजगी जमिन संपादित करणे म्हणजे काय याचे मार्गदर्शन व्हावे.<br><br>श्री महेश मधुकर रासनकर , कार्यकारी अभियंता, ल.पा.वि. सांगली यांनी उत्तर दिले – प्रकल्प कामा संदर्भात शेतक-याची एखदा गुठां घ्यावा लागतो. प्रत्येक गावातून किमान २ ते ३ गुंठे लागणार व त्याचा मोबदला रेडीरेकनर प्रमाणे जी किंमत होईल त्या स्वरुपात देणेत येईल. |
| ३. | श्रीमती मेघा जीवन पुकळे, पंयायत समिती सदस्य, मुळीकवाडी | पाणी उचलण्यासाठी वीज बिलाच्या अडचणी येतात त्याचे काय करायचे . पाण्यासाठी जो व्हॉल बसवणार त्यासाठी शेतक-यांनी काय करावे.<br><br>श्री महेश मधुकर रासनकर , कार्यकारी अभियंता, ल.पा.वि. सांगली यांनी उत्तर दिले – हा प्रश्न पर्यावरणीय सुनावणीसंदर्भात नाही. उपसा सिंचन पाणीपट्टी चे दर महाराष्ट्र जीवन जलसंपत्ती प्राधिकरण हे कार्यालय ठरवते. तसेच पाण्याचा किती उपसा होणार आहे यावर हे दर अवलंबून असतात. एकूण वीजबीलापैकी ८१ टक्के |

| | | |
|---|---|---|
| | | वीजबील हे शासन भरते तर उर्वरीत वीजबील शेतकरी भरतात. तसेच मागणी केल्याशिवाय पाणी मिळणार नाही. रितसर मागणी केल्यानंतर पाणी मिळेल. |
| ४. | श्री अनिल प्रतापराव भोसले, कलेढोण | टेंभू प्रकल्पासाठी सर्व अधिका-यांचे अभिनंदन व धन्यवाद. तसेच ओढयांना पाणी कधी सुटणार आहे हे कळावे<br><br>श्री महेश मधुकर रासनकर , कार्यकारी अभियंता, ल.पा.वि. सांगली यांनी उत्तर दिले – शेतक-यांनी मागणी किती केली आहे त्यानुसार पाणीच्या पुरवठा होणार आहे. वीस ते २५ शेतक-यांनी मिळून पाणी मागणी केली असता पाणीपट्टी भरुन तलावात, ओढयात पाणी सोडणेत येणार आहे. मागणी वर पुरवठा अवलंबून आहे. |
| ५. | श्री बजरंग नाना कदम, शेणवडी | बरेच तलाव कोरडे आहेत. त्यात पाणी सोडले तर बरे होईल.<br><br>श्री महेश मधुकर रासनकर , कार्यकारी अभियंता, ल.पा.वि. सांगली यांनी उत्तर दिले – हा सिंचनाचा विषय आहे. जेव्हा टेंभू योजना पूर्ण होईल तेव्हा पाणी येईल. शेतक-यांनी रितसर मागणी करावी. |
| ६. | श्री मोसीन शेख,. कलेढोण | वनखात्याची परवानगीसाठी काय करावे लागेल.<br><br>श्री महेश मधुकर रासनकर , कार्यकारी अभियंता, ल.पा.वि. सांगली यांनी उत्तर दिले –टेंभू विस्तारीत प्रकल्पाची पाईपलाईन जेथून वनजमीनीतून जात आहे त्या मान्यतेसाठी आधिच अर्ज सादर केला आहे. परंतु वैयक्तीक शेतक-यांची पाईपलाईन वनजमिनीतून जात असेल तर त्यासाठी तुम्हाला परवानगीसाठी कायदेशीर रित्या अर्ज करावा लागेल. एक महत्त्वाची बाब म्हणजे प्रकल्पाला वन खात्याची जमिनीची परवानगी मिळाल्याशिवाय जलसुनावणी घेता येत नाही. म्हणजेच वनखात्याची परवानगी आहे. |
| ७. | श्री हणमंत निवृत्ती देशमुख , विखळे | प्रकल्पाचे पाणी ओढया / तलावात सोडणार आहात. परंतु शेजारच्या लोकांना त्याचा काही उपयोग होईल का याचे मार्गदर्शन करावे. तसेच या प्रकल्पाला कोणताही विरोध नाही. सर्वांची संमत्ती आहे. पण ज्यावेळी काही तांत्रिक प्रश्न |

| | | |
|---|---|---|
| | | निर्माण होतील तेव्हा अधिकारी यांनी ते प्रश्न सोडवले पाहिजेत.<br><br>श्री महेश मधुकर रासनकर , कार्यकारी अभियंता, ल.पा.वि. सांगली यांनी उत्तर दिले – ओढे , तलावात पाणी सोडणार आहे. तेथून शेतक-याने उचलून घ्यावे. त्यासाठी आवश्यक पाणी पट्टी भरणा करावी. तसेच हा तांत्रिक प्रश्न आहे. हि सुनावणी पर्यावरणीय आहे. म्हणून पर्यावरणाशी संबंधीत प्रश्न असावेत. |
| ८. | श्री शिवाजी साबळे, तटवडे | सर्व ५१ गावांच्या वतीने सर्व अधिकारी यांचे आभार. ही सुनावणी पर्यावरणाची आहे. आमचा कोणाचाही या सुनावणीस पर्यावरणीय आक्षेप नाही. ही योजना लवकरात लवकर मंजूर झाली पाहिजे. मुख्य प्रश्न पाण्याचा आहे. खूप वर्षे झाली पाणी नाही. तेव्हा योजना पूर्ण करुन पाणी लवकर दयावे. |
| ९. | श्री अनिल पवार | पर्यावरणीय लोकसुनावणीमध्ये ५१ गावे आहेत. परंतु जि जाहिरात प्रसिध्द केली त्यात ४६ गावे आहेत. जी ५ गावे राहिली ती पाण्यापासून वंचित राहू नयेत हि विनंती.<br><br>श्री महेश मधुकर रासनकर , कार्यकारी अभियंता, ल.पा.वि. सांगली यांनी उत्तर दिले – प्रसिध्द झालेल्या जाहिरातमध्ये प्रिंटींग मध्ये चूक झाली असून माण तालुक्यातील २० खटाव तालुक्यातील ३१ अशी एकूण ५१ गावे या प्रकल्पात सिंचित होणार आहेत. |
| १० | श्री अमोल आप्प काटकर, किरकसाळ ( माजी सरपंच) | सदर योजनेस ५१ गावांच्या वतीने जाहिर पाठींबा आहे. पर्यावरणाचा आराखडा अतिशय सुंदर तयार केला आहे. किरकसाळ मध्ये २१३ प्रकारचे पक्षी बघायला मिळतात. १६ प्रकारचे सस्तन प्राणी, २०० पेक्षा जास्त वनस्पतीच्या जाती आहेत. हे सर्व उरमोडी नदीचे पाणी आलेमुळे शक्य झाले. टेंभू योजनेस आमची कोणाचीही अडचण नाही किंवा आक्षेप नाही. प्रत्येक गावाच्या व माध्यमिक विदयालयाच्या माध्यमातून हरीतपट्टा जो निर्माण करतो त्यात त्यांचा सहभार घ्यावा. कामगारांच्या आरोग्याची काळजी घ्यावी. ध्वनी |

| | | |
|---|---|---|
| | | प्रदूषणांची ही अडचण नाही. तसेच हवा प्रदूषणाची अडचण नाही. गावाकडील हवामानाची स्थिती उत्तम आहे. तसेच छोटया ग्रामपंचायतींना मदत करावी. सर्व लोकांच्या वतीने पुन्हा एकदा आभार. |
| ११ | दिपक खाशाबा खताळ, विखळे | ५१ गावाच्या लोकांच्या वतीने आभार. टेंभूचे पाणी मंजूर झाल्यापासून सर्व शेतक-यामध्ये आनंदाचे वातावरण आहे. टेंभू प्रकल्पातून शेतक-यांचे आर्थिक जीवनमान उंचावणार आहे. पर्यावरणाची कोणतीही अडचण नाही. जाहिर पाठींबा आहे. |

तद्नंतर मा. श्री. अमोल सातपुते , उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सातारा यांनी पुन:श्च एकदा आपली मते मांडण्याबाबत उपस्थितांना आवाहन केले असता, कोणताही प्रतिसाद मिळाला नाही.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मा. अध्यक्षांच्या वतीने सर्व उपस्थितांचे बैठकीस उपस्थित राहिल्याबद्दल आभार मानले तदनंतर मा.अध्यक्ष यांचे आभार मानून, त्यांचे पूर्वपरवानगीने जनसुनावणी संपन्न झालेचे घोषित करण्यात आले.

सदर प्रकल्पाबाबत एकही लेखी सूचना/आक्षेप प्राप्त झालेले नाहीत.

सदरच्या सुनावणीची कार्यवाही सकाळी ११.०० वाजता सुरू होऊन दुपारी २.३० वाजता पार पडली.

Amol Satpute

**(श्री अमोल सातपुते )**
आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा उप प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,सातारा

**(श्री प्रशांत गायकवाड,)**
सदस्य - **प्रादेशिक अधिकारी, पुणे यांचे प्रतिनिधी**,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा उप-प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,पुणे

**( श्री नागेश पाटील)**
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा निवासी उपजिल्हाधिकारी तथा अप्पर जिल्हा दंडाधिकारी , सातारा